माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ८५६/२०२२**

**अपिलार्थी**—श्री. संजय महादेव खोब्रागडे

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी कनिष्ठ सहाय्यक,**
**तालुका आरोग्य कार्यालय, भामरागड, ता. भामरागड, जि. गडचिरोली**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी,**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, भामरागड, ता. भामरागड, जि. गडचिरोली**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधीकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १०.१०.२०२१ | निरंक | १०.०१.२०२२ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.१०.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकरिता असलेल्या वाहनांचे जानेवारी २०२० ते सप्टेंबर २०२१ पर्यंत लॉकबुकची सत्यप्रत देण्यात यावी तसेच सदर कालावधीतील खर्चाची नोंद असलेल्या पानाची तसेच लेखापरिक्षण केलेल्याची नोंद असलेल्या पानाची सत्यप्रत मिळणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावरजन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कुठलाच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १०.०१.२०२२** रोजी कलम १९ (१) नुसारप्रथमअपिलीयअधिकारी यांचेकडे "मागविण्यात आलेली माहिती अप्राप्त" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)नुसार आयोगाकडे दि. २१.०३.२०२२ रोजी "मागविण्यात आलेली माहिती अप्राप्त" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. २३.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज

दि. ०६.०५.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहाय्यक,तालुका आरोग्य कार्यालय, भामरागड, ता. भामरागड, जि. गडचिरोली, श्री. नामदेव येरेवार ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, भामरागड, ता. भामरागड, जि. गडचिरोली, श्री. मिलिंद मेश्राम ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्यापकता लक्षात घेता तसेच त्यांनी दाखल केलेला अर्ज हा कोरोना कालावधीत दाखल केलेला असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता तसेच तत्कालीन तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकरिता असलेल्या वाहनांचे लॉगबुक संदर्भातील माहिती तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचेशी संपर्क व समन्वय साधून वरील माहितीच्या अवलोकनाकरीता कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत एक निश्चित वेळ ठरवून पाचारण करावे. अवलोकन करतेवेळी कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप होणार नाही, तसेच मुळ दस्ताऐवजांना हानी पोहचणार नाही, याची अपिलार्थी यांनी काळजी घ्यावी. यात अपिलार्थी यांनी अवलोकनाअंती चिन्हांकित केलेल्या माहितीपैकी ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावी व उर्वरित माहितीसाठी शुल्क आकारावेत, या निर्देशासह प्रस्तू व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०६.०५.२०२४**

जावक क्रमांक E803 -------------- दिनांक 26 AUG 2024 -------------------------